# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## बुधवार, दिनांक १० डिसेंबर, २०१४

## (सकाळी ११.०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे -**

**दोन : स्थगन प्रस्तावाच्या सूचना - (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये).**

**तीन : औचित्याचे मुद्दे - (असल्यास)**

**चार : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :-**

(१) **सर्वश्री गणपत गायकवाड,** बाबुराव पाचर्णे, हनुमंत डोळस, विजय वडेट्टीवार, कुणाल पाटील, अमीन पटेल, अस्लम शेख, श्रीमती निर्मला गावीत, सर्वश्री मो.आरिफ (नसीम) खान, संग्राम थोपटे, जीतेंद्र आव्हाड, ॲड.राहुल कुल, दिपक चव्हाण, **वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **दुग्धविकास मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"आंतरराष्ट्रीय बाजारात दुधाच्या पावडरचे दर कमी झाल्यामुळे दूध पावडर उत्पादकांनी दूधाची कमी दराने सुरू केलेली खरेदी, त्याचबरोबर राज्यात माहे ऑक्टोबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान दुधाच्या दरात लिटरमागे ५ ते ६ रुपयांनी घट होणे, गाईच्या दुधाचा दर २८ रुपयांवरुन २० रुपयांपर्यंत पोहचणे, दुधाचे दर कमी झाल्यानंतरही पशुखाद्याचे वाढलेले दर कमी न होणे, दूध खरेदी दरात घसरण होऊनही दुध उत्पादक शेतकऱ्याला दुधाला बाजार न मिळणे व सर्वसामान्य ग्राहकालाही चढ्या भावाने दुध खरेदी करावे लागत असताना व्यापारी अथवा मध्यस्थांना (डिलरला) मात्र फायदा होत असणे, राज्यात जादा दुधाचा प्रश्न निर्माण होणे, दुध दराचा फटका मात्र शेतकऱ्यांना बसणे, पशुखाद्य, भुसा, गाईच्या वाढलेल्या किमती, चारा, औषधे यांच्या किमती वाढल्याने दुधाच्या दरात व इतर खर्चात मोठी तफावत होत असल्याने शेतकऱ्यांमध्ये पसरलेला असंतोष, राज्यातील दूध उत्पादक शेतकऱ्यांना दुध दरात ३ ते ४ रुपयांनी वाढ करुन देण्याबाबत व मध्यस्त अथवा व्यापारी यांचे कमिशन कमी करुन ग्राहकांना योग्य दरात दुध देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(२) **सर्वश्री जीतेंद्र आव्हाड,** संदीप नाईक, बाबुराव पाचर्णे, लक्ष्मण जगताप, सुभाष उर्फ पंडीतशेट पाटील, धैर्यशिल पाटील, योगेश सागर, छगन भुजबळ, श्रीमती ज्योती कालानी, डॉ.बालाजी किणीकर, सर्वश्री.रुपेश म्हात्रे, शांताराम मोरे, सुरेश

हाळवणकर, प्रताप सरनाईक, सुभाष भोईर, सुनील प्रभू, रणधीर सावरकर, प्रकाश भारसाकळे, गोवर्धन शर्मा, **वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **पर्यावरण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"राज्यातील प्रमुख २८ नद्या प्रदुषणाच्या विळख्यात असणे, प्रदुषणामुळे नदीकाठावरील गावांना होत असलेला जीवघेणा त्रास, गावातील रहिवाशी आणि पाळीव जनावरांच्या जीवितास धोका निर्माण होत असूनही आजवर शासनाकडून कुठलीच उपाययोजना हाती न घेतल्याचे स्पष्ट होणे, गुजरात राज्याच्या वापी व राज्यातील रायगड, नवी मुंबई, तळोजा, पाताळगंगा येथील केमिकल तयार करणाऱ्या कंपन्यांतील टाकाऊ व विषारी रसायन टँकरव्दारे उल्हासनगर शहरातील वालधुनी नदीत दिनांक २९ नोव्हेंबर, २०१४ रोजी सोडल्याने उल्हासनगरमधील ३८० नागरिक व दोन नवजात बालकांसह ११५ लहान मुलांमुलींना झालेली विषबाधा, नद्या प्रदूषित करणाऱ्या कारखान्यांवर कारवाई करण्यात राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळ अपयशी ठरत असणे, नुकतेच डोंबिवली येथील पाणी प्रदूषित करणारे २२ कारखाने बंद केले असताना सदरहू कारखाने पुन्हा सुरु करण्याची नियंत्रण मंडळाने दिलेली मान्यता, राज्यातील प्रदूषित झालेल्या मुंबई येथील मिठी, ठाण्यातील काळू, मुठा, उल्हास, भातसा तर पश्चिम महाराष्ट्रातील पवना, मुळा, मुठा, भिमा, इंद्रायणी तसेच गोदावरी, पंचगंगा, पाताळगंगा, कृष्णा, चंद्रभागा या प्रमुख नद्यांचा समावेश असणे, गाळाने नद्यांचे पात्र उथळ होणे, यामुळे नद्यांना थोडा पाऊस आला तरी पुरस्थिती निर्माण होणे, नदी संवर्धन कार्यक्रमांतर्गत नद्यांना प्रदूषित होऊ नयेत याकरीता निधी उपलब्ध करून दिला जात असूनही यावर कुठलीच प्रभावी व ठोस अंमलबजावणी न होणे, केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या आकडेवारीनुसार राज्यातील मोठ्या नद्यांव्यतिरिक्त छोट्या नद्याही प्रदूषित झाल्या असल्याचे निष्पन्न होत असणे, यामुळे जनतेच्या आरोग्याचा निर्माण झालेला प्रश्न, या सर्व बाबी लक्षात घेता शासनाने तात्काळ नद्यांचे प्रदूषण रोखण्याकरीता कायमस्वरुपी प्रभावी उपाययोजना हाती घेण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

**(३)** **सर्वश्री विजय वडेट्टीवार,** अमीन पटेल, अस्लम शेख, सुरेश धानोरकर, किशोर आप्पा पाटील, जीतेंद्र आव्हाड, सुधाकर देशमुख, कृष्णा खोपडे, विकास कुंभारे, डॉ.आशिष देशमुख, सुधाकर कोहळे, समीर मेघे, अबु आजमी, चरण वाघमारे, रवि राणा, बच्चू कडू, **वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **पणन मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"केंद्र शासनाला कापसासाठी ७००० रूपये प्रति क्विंटल असा भाव देण्याची शेतकऱ्यांची मागणी असताना त्यांना बाजारात ५५०० रूपये पेक्षा कमी प्रतिक्विंटल भाव मिळत असणे धान, सोयाबीन, मका, भुईमूग, उडीद इत्यादी अनेक पिकांना रास्त भाव मिळत नसणे, केंद्र शासनाने निर्यातीवर बंदी घालून शेतमालाची आयात धोरण स्विकारणे, त्यामुळे राज्यातील शेतकरी अडचणीत येणे, शेतीमालाला योग्य

भाव देण्याची मागणी शेतकऱ्यांकडून शासनाकडे करण्यात येऊनही, सदर मागणीकडे राज्य शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, हमी भाव मिळण्यासाठी शेतकरी व त्यांच्या संघटनाने आंदोलने करणे, यासंदर्भात राज्य शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**( दुपारी १.३० ते २.०० वाजेपर्यंत- मध्यंतर )**

पाच : **राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा व उत्तर.**

सहा : **सर्वश्री चैनसुख संचेती, जयप्रकाश मुंदडा,सुभाष साबणे, डॉ.देवराव होळी, डॉ.आशिष देशमुख, सर्वश्री सुरेश धानोरकर, सुधाकर देशमुख, डॉ.शशिकांत खेडेकर, श्री. हरिष पिंपळे, प्रा.अशोक उईके, सर्वश्री. कृष्णा गजबे, हेमंत पाटील, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :(चर्चा पुढे सुरु)**

"राज्यातील मराठवाडा, विदर्भ इत्यादी भागात दुष्काळामुळे शेतकऱ्यांपुढे निर्माण झालेली गंभीर समस्या, दुष्काळी व नापिकी परिस्थितीमुळे शेतकऱ्यांच्या वाढीस लागलेल्या आत्महत्या, राज्यात अनेक वर्षांपासून येणाऱ्या दुष्काळासारख्या नैसर्गिक आपत्तीवर मात करण्यासाठी आतापर्यंत शासनास आलेले अपयश, दुष्काळी परिस्थितीवर दूरदृष्टीने नियोजनबध्द कायमस्वरुपी उपाययोजना करण्यासाठी कोणतीही ठोस कृती करण्यात न येणे, दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकऱ्यांवर ओढवलेल्या हलाखीच्या परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी आलेला निधी, प्रत्यक्ष दुष्काळग्रस्त शेतकरी जनतेपर्यंत पोहोचविण्यास शासनास आलेले अपयश तसेच मदत निधीच्या वाटपात झालेला भ्रष्टाचार व गैरव्यवहार, जलसंधारणाच्या कामांची शास्त्रशुध्द पध्दतीने अंमलबजावणी न होणे, शेतकऱ्यांना दिलासा न देण्यास गेल्या १५ वर्षाच्या शासनाचा कारभारच जबाबदार असणे, त्यामुळे जनतेमध्ये निर्माण झालेला असंतोष, राज्यातील शेतकऱ्यांच्या हितासाठी शासनाने कृषी धोरण आखून त्याबाबत करावयाची कायमस्वरुपी उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

सात : **शासकीय विधेयके :-**

**विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

**(अ)** (१) **भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये सर्वश्री अबू आसिम आजमी, विजय वडेट्टीवार, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"ही विधानसभा सन २०१४ चा अध्यादेश क्रमांक १५ - महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा) अध्यादेश, २०१४ नापसंत करते."

(२) सन २०१४ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३० - महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा) विधेयक, २०१४.

(३) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री धैर्यशील पाटील, सुभाष ऊर्फ पंडीतशेट पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१४ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३० - महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा) विधेयक, २०१४ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(ब)** (१) **भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये सर्वश्री अबू आसिम आजमी, विजय वडेट्टीवार, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"ही विधानसभा सन २०१४ चा अध्यादेश क्रमांक १७ - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) अध्यादेश, २०१४ नापसंत करते."

(२) सन २०१४ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३३ - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१४.

(३) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री धैर्यशील पाटील, सुभाष ऊर्फ पंडीतशेट पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१४ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३३ - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१४ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**विधान भवन,**
नागपूर,
दिनांक : ९ डिसेंबर, २०१४

**डॉ. अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.